# शिपाई/चौकीदार/कालवा टपाली/प्रयोगशाळा परिचर

वेळ : 1.30 तास | एकूण प्रश्न : 100 | एकूण गुण : 100

1. पुढीलपैकी कोणत्या भाषेची लिपी देवनागरी नाही ?
(A) गुजराती (B) संस्कृत (C) तामिळ (D) हिंदी

2. मुलावर खोटे खोटे डोळे वटारणे ही बाब कशात येते ?
(A) कृत्रिम भाषा (B) नैसर्गिक भाषा (C) स्वाभाविक भाषा (D) पर्याय A व B बरोबर

3. अभिनय कला, नृत्यनाट्ये ही कोणत्या भाषेची उदाहरणे आहेत ?
(A) कृत्रिम भाषा (B) नैसर्गिक भाषा (C) पर्याय A व B बरोबर (D) यापैकी नाही

4. पुढीलपैकी जोडाक्षर ओळखा.
(A) त् (B) व् (C) क्ष (D) क्ष्

5. पुढीलपैकी कोणते व्यंजन अनुनासिक नाही ?
(A) ङ् (B) म् (C) स (D) ग्

6. 'घंटा' या शब्दाचे पर्यायी लिखाण निवडा.
(A) घण्टा (B) घङ्टा (C) घन्टा (D) घंन्टां

7. ओठाचा एकमेकाशी किंवा जिभेचा कोणत्याही भागाचा मुखातील कोणत्याही अवयवाशी स्पर्श न होता मुखावाटे जे ध्वनी बाहेर पडतात त्यांना काय म्हणतात ?
(A) व्यंजन (B) स्वर (C) संधी (D) अनुस्वार

8. भाषा म्हणजे काय ?
(A) शब्द
(B) बोलणे
(C) ऐकणे
(D) विचार व्यक्त करण्याचे साधन

9. पुढीलपैकी कोणता वर्ण दीर्घ स्वर नाही ?
(A) आ (B) इ (C) ई (D) ऊ

10. मराठी भाषेत लेखन कोणत्या लिपित केले जाते ?
(A) नागरी (B) मोडी (C) संस्कृत (D) देवनागरी

11. वाक्य म्हणजे काय ?
(A) अर्थपूर्ण अक्षरसमूह
(B) अर्थपूर्ण शब्दसमूह
(C) शब्दाचे बदललेले रुप
(D) क्रियापद रहित शब्द समूह

SPACE FOR ROUGH WORK

12. खालीलपैकी अधोरेखित शब्दाची जात ओळखा.
 नुसती फुशारकी काय कामाची ?
 (A) सामान्यनाम (B) विशेषण (C) भाववाचक नाम (D) धातुसाधित नाम
13. 'हुशारी' हा शब्द नामाच्या कोणत्या प्रकारात मोडतो ?
 (A) सामान्यनाम (B) विशेषण (C) भाववाचक नाम (D) धातुसाधित नाम
14. खालीलपैकी अधोरेखित शब्दाची जात ओळखा.
 हे दूध खूप चविष्ट आहे.
 (A) धातुसाधित नाम (B) विशेषण (C) सामान्यनाम (D) सर्वनाम
15. खालीलपैकी अधोरेखित शब्दाची जात ओळखा.
 उत्तरेकडे हिमालय पर्वत आहे.
 (A) सर्वनाम (B) विशेषनाम (C) धातुसाधित नाम (D) क्रियापद
16. खालीलपैकी विशेषनाम नसलेला शब्द ओळखा.
 (A) सुरेश (B) गंगा (C) गाय (D) भारत
17. खालीलपैकी विशेषनाम असलेला शब्द ओळखा.
 (A) सरस्वती (B) नवलाई (C) वाघ (D) महासागर
18. वाक्याचा अर्थ पूर्ण करणाऱ्या शब्दाला काय म्हणतात ?
 (A) विशेषण (B) क्रियापद (C) सर्वनाम (D) नाम
19. अधोरेखित शब्दाची जात ओळखा.
 राधाचे नविन खेळणे मोडले.
 (A) सकर्मक क्रियापद (B) अकर्मक क्रियापद (C) द्विकर्मक क्रियापद (D) संयुक्त क्रियापद
20. अधोरेखित शब्दाची जात ओळखा.
 अंजलीने रामायण वाचले.
 (A) सकर्मक क्रियापद (B) अकर्मक क्रियापद (C) उभयविध क्रियापद (D) यापैकी नाही
21. 'लवकर' शब्दाची जात कोणती ?
 (A) क्रियाविशेषण (B) उभयान्वयी अव्यय (C) क्रियापद (D) यापैकी नाही
22. 'तू नोकरीला लागला नाहीतर आपली आर्थिक स्थिती ढासळेल'. यातील उभयान्वयी शब्द शोधा.
 (A) तू (B) नोकरी (C) आर्थिक स्थिती (D) नाहीतर
23. प्रत्यय कोणत्या विभक्तीचा आहे ते ओळखा ?
 मनुष्याने लोभ धरु नये.
 (A) द्वितीया (B) तृतीया (C) चतुर्थी (D) पंचमी

SPACE FOR ROUGH WORK

24. प्रत्यय कोणत्या विभक्तीचा आहे ते ओळखा.

    अमेरिकेहून माझा मामेभाऊ आला आहे.

    (A) द्वितीया (B) तृतीया (C) षष्टी (D) पंचमी

25. अधोरेखित शब्दाचे विभक्ती अर्थ ओळखा.

    कार्यालयात नियमित व वेळेवर यावे.

    (A) कर्ता (B) करण (C) अधिकरण (D) संबंध

26. श्रीचक्रधर स्वामी __________ धारण करुन महाराष्ट्रात आले.

    (A) शांतवृत्ती (B) संयमीवृत्ती (C) वैराग्यवृत्ती (D) यापैकी नाही

27. महानुभव पंथाची स्थापना __________ यांनी केली.

    (A) ज्ञानेश्वर (B) श्रीचक्रधरस्वामी (C) समर्थ रामदास (D) तुकाराम महाराज

28. संत नामदेव __________ निस्सीम भक्त होते.

    (A) विठ्ठलाचे (B) रामाचे (C) हनुमानाचे (D) कृष्णाचे

29. संत ज्ञानेश्वरांचा जन्म सन् __________ मध्ये झाला.

    (A) 1265 (B) 1270 (C) 1275 (D) यापैकी नाही

30. संत एकनाथांनी __________ प्रसार केला.

    (A) ज्ञानमार्गाचा (B) भक्तिमार्गाचा (C) कर्ममार्गाचा (D) यापैकी नाही

31. समर्थ रामदासांचा जन्म __________ दिवशी झाला.

    (A) विजयादशमी (B) रामनवमी (C) कृष्णाष्टमी (D) एकादशी

32. समर्थ रामदासांनी लोकांना __________ उपासना करण्यास शिकविले.

    (A) विठ्ठलाची (B) देवीची (C) रामाची (D) शक्तीची

33. 'आपण दु:खी कष्टी झाल्यावर जगाचे कल्याण कोण करील' ही शिकवण कोणाची आहे ?

    (A) मुक्ताबाई (B) संत ज्ञानेश्वर (C) संत तुकाराम (D) समर्थ रामदास

34. संतांनी लोकांच्या मनात __________ निर्माण केला.

    (A) आदरभाव (B) भक्तिभाव (C) राष्ट्राभिमान (D) यापैकी नाही

35. जिजामाता ही सिंधखेडच्या __________ मुलगी होती.

    (A) लखुजीराव जाधवांची (B) लखुजीराव भोसल्यांची

    (C) मालोजी भोसल्यांची (D) निंबाळकरांची

36. महाराष्ट्रात __________ लेण्याजवळ घृष्णेश्वरांचे सुंदर मंदिर आहे.

    (A) अजिंठा (B) वेरुळ (C) घारापुरी (D) यापैकी नाही

SPACE FOR ROUGH WORK

37. उत्तरेच्या मुघल बादशहाने स्वारी केली त्यावेळी __________ ही निजामशाहची राजधानी होती.
(A) अहमदनगर (B) सिंधखेड (C) वेरुळ (D) दौलताबाद

38. निजामशाहचा __________ हा कर्तबगार वजीर होता.
(A) मलिक अंबर (B) फत्तेखान (C) शरिफजी (D) यापैकी नाही

39. शिवनेरी किल्ल्याचा किल्लेदार __________ याने जिजाबाईच्या रक्षणाची जबाबदारी स्विकारली.
(A) दादोजी कोंडदेव (B) फिरंगोजी नरसाळा (C) विजयराज (D) यापैकी नाही

40. शिवरायांचा जन्म __________ किल्ल्यावर झाला.
(A) पुरंदर (B) शिवनेरी (C) पन्हाळा (D) प्रतापगड

41. मुघलांच्या सेवेत दाखल झाल्यानंतर मुघल बादशहा __________ याने शहाजीराजांना आपली सरदारकी बहाल केली.
(A) औरंगजेब (B) शाहजहान (C) जहांगीर (D) यापैकी नाही

42. शहाजीराजे __________ गाढे पंडित होते.
(A) संस्कृतचे (B) कन्नडचे (C) तामिळचे (D) यापैकी नाही

43. दादोजी कोंडदेव हे __________ सुभेदार होते.
(A) पुरंदरचे (B) शिवनेरीचे (C) कोंढाण्याचे (D) रायगडचे

44. मावळात राहणाऱ्या लोकांना __________ म्हणतात.
(A) शेतकरी (B) सैनिक (C) मावळे (D) यापैकी नाही

45. शिवाजीराजे व सईबाई यांचा विवाह पुण्याच्या __________ मोठ्या थाटामाटाने साजरा झाला.
(A) शनिवार वाड्यात (B) लाल महालात (C) विश्रामबाग वाड्यात (D) यापैकी नाही

46. शिवबा आणि त्यांच्या सवंगड्यांनी __________ साली रायरेश्वराच्या मंदिरात स्वराज्याची शपथ घेतली.
(A) 1640 (B) 1645 (C) 1650 (D) यापैकी नाही

47. शिवरायांची स्वतंत्र राजमुद्रा __________ तयार केली.
(A) जिजाऊंनी (B) शहाजीराजांनी (C) दादोजी कोंडदेवांनी (D) मावळ्यांनी

48. शिवरायांच्या काळात बहुदा राजमुद्रा __________ भाषेत असत.
(A) अरबी (B) फारसी (C) उर्दू (D) यापैकी नाही

49. शिवरायांची राजमुद्रा __________ भाषेत होती.
(A) अरबी (B) फारसी (C) मराठी (D) संस्कृत

50. तोरणा किल्ल्यावर सापडलेले धन __________ कामी आले.
(A) सैन्याच्या (B) राजवाड्याच्या (C) स्वराज्याच्या (D) यापैकी नाही

SPACE FOR ROUGH WORK

51. शिवरायांच्या स्वराज्याची पहिली राजधानी __________ ही सजली.
(A) रायगड (B) राजगड (C) प्रतापगड (D) यापैकी नाही

52. अफजलखान बारा वर्षे __________ सुभेदार होता.
(A) पुण्याचा (B) वाईचा (C) कोल्हापुरचा (D) साताऱ्याचा

53. बाजीप्रभू देशपांडे __________ धारातीर्थी पडले.
(A) वतनासाठी (B) सरदारकीसाठी (C) स्वराज्यासाठी (D) यापैकी नाही

54. अफजलखानाच्या वधानंतर शिवरायांनी विजापुरकरांच्या ताब्यातील __________ जिंकला.
(A) पन्हाळगड (B) विशालगड (C) प्रतापगड (D) यापैकी नाही

55. शिवराय __________ शब्दावर विश्वास ठेवून आगऱ्यास बादशहाच्या भेटीस गेले.
(A) दिलेरखानच्या (B) शायिस्तेखानच्या (C) जसवंतसिंगाच्या (D) यापैकी नाही

56. आगऱ्याहून येताना शिवाजीराजांनी संभाजीराजांना __________ एका सुरक्षित ठिकाणी ठेवले.
(A) झाशीत (B) मथुरेत (C) ग्वालियरमध्ये (D) यापैकी नाही

57. कुतुबशाहची __________ ही राजधानी होती.
(A) दिल्ली (B) जिंजी (C) गोवळकोंडा (D) यापैकी नाही

58. शिवाजीराजे धर्म, जात न पाहता माणसाची __________ पाहून त्यास नोकरीवर ठेवत.
(A) आर्थिक स्थिती (B) हुशारी (C) योग्यता (D) यापैकी नाही

59. धारदार वस्तु चुकीच्या पद्धतीने हाताळल्यास आपल्याला __________ होवू शकते.
(A) घात (B) आनंद (C) दुःख (D) इजा

60. 'परवा पंचगंगेच्या पुलावरून पळता पळता पुष्पा परशुराम पळस्पे पाण्यात पडली हे पाहताच पोलिस पुष्पाच्या दिशेने पळाले'. या वाक्यात 'प' हे अक्षर किती वेळा आले आहे ?
(A) सतरा वेळा (B) चौदा वेळा (C) पंधरा वेळा (D) सोळा वेळा

61. 2, 4. 5. 4, 3, 4, 2, 4, 7. 4. 8. 4, 8, 4, 2, 4
वरील अंकमालिकेत आठ वेळा आलेला अंक कोणता ?
(A) 3 (B) 2 (C) 4 (D) 5

62. खाली दिलेल्या संख्यापैकी सर्वात मोठ्या संख्येतील अंकाची बेरीज किती येईल ?
37, 49, 52. 45. 44
(A) 7 (B) 10 (C) 13 (D) 9

63. संख्यामाला 5556. 4445, 2223, 1112, 3334
वरील संख्यामालेतील संख्या क्रमाने लावल्यास मध्यभागी कोणती संख्या येईल ?
(A) 1112 (B) 3334 (C) 4445 (D) 2223

SPACE FOR ROUGH WORK

64. खालीलपैकी किती मूळ संख्यांच्या अंकांच्या जागेत अदलाबदल केल्यास येणाऱ्या संख्याही मूळ संख्याच असतील ?
13, 17, 61, 23, 31
(A) एक (B) चार (C) तीन (D) दोन

65. 1 ते 50 पर्यंत असणाऱ्या किती दोन अंकी मूळ संख्यांमध्ये 3 हा अंक एककस्थानी आला आहे ?
(A) पाच (B) तीन (C) चार (D) दोन

66. 1 ते 50 पर्यंत असणाऱ्या किती दोन अंकी मूळ संख्यामध्ये 3 हा अंक दशमस्थानी आला आहे ?
(A) पाच (B) तीन (C) चार (D) दोन

67. 7, 0, 1 यातील 0 पुन्हा पुन्हा वापरून तयार होणाऱ्या सर्वात मोठ्या व सर्वात लहान चार अंकी संख्यामध्ये फरक किती ?
(A) 6930 (B) 6039 (C) 6093 (D) 6309

68. गटात न बसणारा शब्द ओळखा.
(A) मटकी (B) गहू (C) ज्वारी (D) बाजरी

69. गटात न बसणारा शब्द ओळखा.
(A) वाटाणा (B) चवळी (C) भोपळा (D) मूग

70. गटात न बसणारा शब्द ओळखा.
(A) नाग (B) सर्प (C) फुरसे (D) फुलपाखरु

71. गटात न बसणारा शब्द ओळखा.
(A) सनई (B) बासरी (C) तंबोरा (D) तुतारी

72. गटात न बसणारी संख्या ओळखा.
(A) 3 (B) 11 (C) 17 (D) 21

73. गटात न बसणारी संख्या ओळखा.
(A) $\frac{5}{10}$ (B) $\frac{7}{14}$ (C) $\frac{2}{5}$ (D) $\frac{3}{6}$

74. गटात न बसणारी संख्या ओळखा.
(A) 14835 (B) 8792 (C) 9211 (D) 5722

75. गटात न बसणारी संख्या ओळखा.
(A) 3.7 (B) 5.5 (C) 8.2 (D) 6.4

76. संख्या मालेतील प्रश्नचिन्हाच्या जागी येणारी संख्या ओळखा.
7, 10, 13, 16, ?
(A) 19 (B) 12 (C) 18 (D) 20

77. संख्या मालेतील प्रश्नचिन्हाच्या जागी येणारी संख्या ओळखा.
504, 605, 706, 807, ?
(A) 709 (B) 809 (C) 907 (D) 908

**SPACE FOR ROUGH WORK**

78. संख्या मालेतील प्रश्नचिन्हाच्या जागी येणारी संख्या ओळखा.

$\frac{4}{9}, \frac{4}{8}, \frac{4}{7}, ?, \frac{4}{5}$

(A) $\frac{5}{9}$ (B) $\frac{3}{6}$ (C) $\frac{4}{6}$ (D) $\frac{4}{10}$

79. पावणे तीन वाजता मिनिट काटा कितीवर असेल ?

(A) 10 वर (B) 9 वर (C) 3 वर (D) 8 वर

80. घड्याळाचा तास काटा व मिनिट काटा एकावर एक असे किती वाजता असतील ?

(A) बारा वाजता (B) अकरा वाजता (C) सहा वाजता (D) एक वाजता

81. काळा : कावळा : : हिरवा : ?

(A) गवत (B) पतंग (C) पोपट (D) कबुतर

82. बर्फ : घनरुप : : वाफ : ?

(A) द्रवरुप (B) घनरुप (C) दमट (D) वायुरुप

83. विळी : चिरणे : : कात्री : ?

(A) किसणे (B) मोडणे (C) कापणे (D) भोक पाडणे

84. विद्यार्थी : शिक्षक : : रोगी : ?

(A) औषध (B) दवाखाना (C) डॉक्टर (D) रोग

85. पहिल्या व दुसऱ्या पदात जसा संबंध आहे अगदी तसाच संबंध तिसऱ्या व चौथ्या पदात आहे. संबंध शोधा व पर्याय निवडा.

90 : 92 : : 98 : ?

(A) 982 (B) 96 (C) 89 (D) 100

86. पहिल्या व दुसऱ्या पदात जसा संबंध आहे अगदी तसाच संबंध तिसऱ्या व चौथ्या पदात आहे. संबंध शोधा व पर्याय निवडा.

18 : 8 : : 28 : ?

(A) 16 (B) 13 (C) 14 (D) 30

87. मावळता सूर्य पाहत असलेल्या अमितच्या मागील दिशा कोणती ?

(A) पूर्व (B) पश्चिम (C) दक्षिण (D) उत्तर

88. बेरजेमध्ये काही अंकांच्या जागी अक्षरे वापरली आहेत. बेरीज नीट पहा व G हे अक्षर कोणत्या अंकासाठी वापरले आहे ?

```
  3 M 5
+ G 4 3
-------
  4 6 N
```

(A) 1 (B) 2 (C) 3 (D) 4

SPACE FOR ROUGH WORK

89. वरील 88 मधील बेरजेमध्ये N व M या अक्षरासाठी वापरलेल्या अंकाची वजाबाकी किती येईल ?

(A) 4 (B) 6 (C) 10 (D) 12

90. खाऊ आणणेसाठी आईने मला 5 रु. च्या तीन नोटा, 1 रुपायांची तीन नाणी व उरलेली 50 पैशाची नाणी दिली. तिने मला एकूण 20 रुपये दिले, तर 50 पैशाची किती नाणी दिली ?

(A) पाच (B) चार (C) तीन (D) सहा

91. हात आणि पाय __________ जोडलेले असतात.

(A) मानेला (B) धडाला (C) पाठीला (D) छातीला

92. चष्मा कशासाठी लावतात ?

(A) सुंदर दिसण्यासाठी (B) चांगले ऐकू येण्यासाठी

(C) स्पष्ट दिसण्यासाठी (D) डोळ्यांच्या संरक्षणासाठी

93. अंध व्यक्ती __________ ब्रेल लिपी वाचतात.

(A) काळा चष्मा लावून (B) बोटाने स्पर्श करून

(C) डोळ्यांनी पाहून (D) ब्रेल लिपीच्या पुस्तकात पाहून

94. कवटीमधील सांधे __________ प्रकारचे आहेत.

(A) अचल (B) मुक्तपणे हालणारे (C) चल (D) खिळीचे

95. मेंदू हा __________ आणि हृदय हे __________ सुरक्षित असते.

(A) डोक्यात, छातीत (B) कवटीत, कण्यात

(C) कण्यात, कवटीत (D) कवटीत, छातीच्या पिंजऱ्यात

96. जांघेच्या ठिकाणी आणि खांद्यात कोणत्या सांध्याच्या साहाय्याने गोलाकार हालचाल करता येते ?

(A) खिळीचा सांधा (B) बिजागरीचा सांधा (C) सरकता सांधा (D) उखळीचा सांधा

97. ओठांची हालचाल कोणत्या प्रकारच्या स्नायूमुळे होते ?

(A) अनैच्छिक (B) अचल (C) ऐच्छिक (D) हाडांना चिकटलेल्या

98. हाडांमध्ये __________ हा तंतुमय पदार्थ असतो.

(A) कॅल्शियम (B) फॉस्फरस (C) कोलाजन (D) मगज

99. घट्ट बाटलीत बंद केलेल्या झुरळांना अन्न पाणी दिले तरी ती मरतात कारण

(A) त्यांना वारा मिळत नाही (B) त्यांना कार्बन डायऑक्साइड मिळत नाही

(C) त्यांना ऑक्सिजन मिळत नाही (D) वरील सर्व पर्याय बरोबर

100. चुन्याच्या निवळीत कोणता वायु सोडल्यावर ती दुधी रंगाची होते ?

(A) ऑक्सिजन (B) नायट्रोजन (C) हायड्रोजन (D) कार्बन डायऑक्साइड

SPACE FOR ROUGH WORK